# ग्रामीण विकासात ग्रामसभेचा सामाजिक व आर्थिक दृष्टिकोन

श्री.गुरूनाथ इश्राम सामंत,संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

..............................................................................................................

**प्रस्तावना** : भारत हा खेडयांचा देश म्हणून ओळखला जातो. भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीवर आधारित आहे. ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू म्हणून ग्रामसभेकडे पाहिले जाते. गावाच्या विकासाचे नियोजन हे ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ग्रामसभेमध्ये केले जाते. भारतात त्रिस्तरीय व्यवस्थेचा पायाभूत घटक म्हणून ग्रामपंचायतीकडे प्रामुख्याने पाहिले जाते. गावातील सामान्य नागरिकांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष शासनाच्या विकास प्रक्रियेत सहभागी होता येते. ग्रामपंचायत गावाच्या सर्वांगींन विकासासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना गावपातळीवर राबविते. यासाठी या योजनांची माहिती ग्रामसेभेमध्ये दिली जाते आणि लोकसहभागातून गावातील विकास केला जातो. ग्रामपंचायत हा विचार नवीन नाही, भारतात प्राचीनकाळापासून ग्रामीण स्तरावर स्थानिक स्वराज्य संस्थाचे अस्तित्व आहे. तथापि काळानुसार ग्रामपंचायतीचे स्वरूप बदलत चालले आहे. गावाचा विकास केल्याशिवाय देशाच्या विकासाची कल्पना योग्य ठरणार नाही. देशातील ग्रामीण भागातील खेडे गावात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये ग्रामपंचयातीची भूमिका महत्वाची आहे. ग्रामपंचायत ही लोकशाहीतील एक महत्वाचा घटक आहे. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून लोकशाहीचे विकेंद्रीकरण आणि ग्रामीण भागातील विकास करण्यासाठी लोकांना सहभागी करून ग्रामीण विकासाचे लक्ष प्राप्त करणे शक्य आहे. ग्रामीण विकास आणि ग्रामपंचायत या एकाच नाण्याच दोन बाजू आहेत यामध्ये शंका नाही.

महात्मा गांधीनी ग्रामपंचायतीचे महत्व स्पष्ट करताना असे म्हणाली की, लोकशाही ही ग्रामीण भागातील लोकांच्यावर आधारित आहे. हे तेव्हा शक्य होईल जेव्हा गावातील लोकांना शासनाला बद्दल योग्य निर्णय घेण्याचा अधिकार मिळेल हा विचार लक्षात घेवून भारत शासनाने अधिनियम १९१९ मध्ये ग्रामपंचायती व्यवस्थेचा माध्यमातून विकेंद्रीकरणाचा महत्व देण्यात आले आहे. तसेच देशातील नियोजनामध्ये ग्रामपंचायतीला सशकत (बळकट) करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहेत. भारतीय राजयघटनेनुसार कलम ४० मध्ये राज्यांना ग्रामपंचायत स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले, त्याचबरोबर संविधानातील सातव्या अनुसूची (राज्यसूची) तील प्रविष्टि ५ मध्ये ग्रामपंचायतीला समाविष्ट करून या संबंधी कायदे बनविण्याचा अधिकार राज्य शासनाला देण्यात आला आहे.

**ग्रामसभेचे स्वरूप :**

भारत हा ग्रामप्रधान देश आहे. ग्राम हा शब्दाला निवडक नावामध्ये जे नाव समाविष्ट केले जाते. त्याला लोक ग्रामसभा असे म्हणतात. ग्रामसभा हा लोकशाहीचा पायाभूत घटक आहे. ग्रामसभेमध्ये २०० पेक्ष जास्त लोक उपस्थितीत असणे आवश्यक आहे. गावाचा आर्थिक विकास, शैक्षणिक, सामाजिक व्यवस्था, पर्यावरण आणि रोजगार इत्यादी कार्याची व्यापकता वाढविण्याचे अधिकार ग्रामसभेला देण्यात आले आहेत. गावाच्या प्रमुख गरजा लक्षात घेवून गावाच्या विकास नियोजनांची दिशा ठरविण्याची जबाबदारी ग्रामसभेच्या माध्यमातून ग्रामपंचायतीची आहे. ज्याप्रमाणे देश पातळीवर लोकसभा, राज्य पातळीवर विधानसभा त्याप्रमाणे गावपातळीवर ग्रामसभा अशी त्रिस्तरीय व्यवस्था भारतात आढळते. लोकसभेचे सभासद हे खासदार असतात. विधानसभेचे सभासद हे आमदार असतात तसेच ग्रामसभेचे सभासद मतदार असतात. व्यक्तीची १८ वर्षे पूर्ण झाली की त्याला मतदान करण्याचा अधिकार मिळतो. त्यामुळे प्रत्येक नागरिक आपोआप ग्रामसभेचा सभासद बनतो. ग्रामसभेची निवडणूक नसते. गावातील प्रत्येक मतदार हा ग्रामसभेचा सदस्य असल्यामुळे ग्रामसभेत उपस्थित राहण्याचा, मत मांडण्याचा, विचार मांडण्याचा अधिकार त्या प्रत्येक सभासदाला असतो. वर्षातून किमान सहा ग्रामसभा घेणे ग्रामपंचायतीवर बंधनकारक आहे. सहा ग्रामसभेपैकी चार ग्रामसभेच्या तारखा निश्चित आहेत त्या खालीलप्रमाणे.

१. २६ जानेवारी — प्रजासत्ताक दिन २ ०१ मे — कामगार दिन

३ १५ ऑगस्ट — स्वातंत्र्य दिन ४ ०२ ऑक्टोबर — महात्मा गांधी जयंती

आर्थिक वर्षातील पहिल्या ग्रामसभेचा अध्यक्ष तसेच निवडणुकीनंतरच्या पहिल्या ग्रामसभेचा अध्यक्ष हा सरपंच असतो. सरपंचाच्या गैरहजेरीत उपसरपंच हा अध्यक्ष असतो. उर्वरित ग्रामसभेचा अध्यक्ष हा मतदारांनी बहुमताने निवडून दिलेला गावातील व्यक्ती हा ग्रामसभेचा अध्यक्ष असतो.

**ग्रामसभेची उद्दिष्टये :**

१. ग्रामसभेमध्ये गावातील विकासाच्या आराखाडयाचे नियोजन करणे.

२. ग्रामसभेचे केंद्र व राज्य शासनाच्या ग्रामीण विकासाच्या व दारिद्र निर्मुलन योजनाची माहिती देणे.

३. विविध शासकीय योजनेच्या माध्यमातून रोजगारनिर्मितीची मागणी करणे.

४. केंद्रशासनाच्या व राज्य शासनाच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थींची निवड करणे.
५. ग्रामीण विकासाशी संबंधित विकास कार्यक्रमांची अमंलबजावणी करणे
६. ग्रामीण आरोग्य, शैक्षणिक, सामाजिक कल्याण इत्यादी कार्यक्रमामध्ये सहभाग घेवून त्यांची योग्य ती तपासणी करणे.
७. गावातील साक्षरता वाढविण्यासाठी, प्रौढशिक्षण, कार्यक्रमांना प्रोत्साहित करणे.
८. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पुढील आर्थिक वर्षातील विकासाचा आराखडा तयार करणे व चर्चा करणे.
९. ग्रामीण समाजातील सर्व जाती व धर्मामध्ये शांतता एकता, समता, बंधुता आणि न्याय यांचा समन्वय राखण्यासाठी गावातील लोकांना ग्रामसभेद्वारे प्रोत्साहित करणे.
१०.ग्रामपंचायतीने मागील चालू वर्षात विविध शासकीय योजना गावाच्या विकासासाठी राबविल्या यावर चर्चा करणे.
११.कृषी विषयक योजनांची माहिती देणे.

**ग्रामसभा आणि सामाजिक सुधारणा :**

ग्रामसभेमध्ये सामाजिक सुधारणांचा विचार—विमर्श होणे काळाची गरज आहे. ग्रामीण भागातील लोकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामध्ये व्यसनाधिनता, वाढती लोकसंख्या, जातीयता, शिक्षण, परंपरांगत चाली—रूढी, अंधश्रध्दा, इत्यादी सामाजिक समस्यांवर मात करण्यासाठी ग्रामसभेमध्ये अंधश्रध्दा, निर्मुलन, अस्पृश्यता, दारूबंदी, खर्चीक विवाह, हुंडाबंदी यावर बंदी घालण्याचे ग्रामसभेचे कर्तव्य आहे. तसेच सामूहिक विवाह, आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहित करणे, गावातील बेरोजगारांना, रोजगार मिळण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत. विविध आजारांची तपासणी करणे, रक्तदान, नेत्र तपासणी, रक्त तपासणी इत्यादी सामाजिक कार्यक्रमांना प्रोत्साहन ग्रामसभेने देणे आवश्यक आहे. तसेच गावात एड्स निर्मुलनाची जनजागृती ग्रामसभेच्या माध्यमातून करणे.

**स्वय:सेवी संघटना व ग्रासभा :**

भारत हा विविधतेने नटलेला एकमेव असा देश आहे. भारतात विविध जाती—धर्माचे लोक वास्तव्य करीत आहेत. त्यांच्यामध्ये समता, बंधूता, एकता, न्याय आणि सद्‌भावना राखण्यासाठी तसेच अनेक सामाजिक सुधारणाचे कार्य करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ग्रामसभेची आहे. यासाठी स्वयंसेवी संघटनाची गरज असते. म्हणून समाजातील स्वयंसेवी संघटनेच्याबरोबर सामाजिक सुधारण्याचे संबंध प्रस्थापित करण्याची जबाबदारी ग्रामसभेची आहे. जेणेकरून सहभागी होणाऱ्या स्वयंसेवी संघटनेच्या माध्यमातून लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांचा प्रचार व प्रसार होईल. ग्रामपंचायतीची जबाबदारी असलेल्या विविध विषयांचा विचार केला असता. स्वयंसेवी संघटना म्हणजेच, शेतकरी संघटना, शेतमजूर संघटना, दुधडेअरी, पर्यावरण संघटना, सहकारी विकास संस्था, दलित संघटना व महिला बचत गट इत्यादी या सर्व स्वयंसेवी संघटनाना विकास कार्यक्रमाध्ये ग्रामसभेने सहभागी करून विकास कार्यक्रम अमंलात आणली पाहिजेत त्यामुळे हे विकास कार्यक्रम जलदगतीने तसेच भ्रष्टाचार मुक्त होतील त्यामुळे ग्रामीण समाजाचा नवचेतना मिळेल. तसेच ग्रामसेभेचे महत्व कमी न होत वाढत जाणार आहे. जेथे ग्रामसभा आणि राजकीय प्रशासन आहे तेथे स्वयंसेवी संघटना जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतीक पैलूना स्पर्श करतात. त्याचबरोबर सध्या ग्रामसभा राज्यघटनेने मान्य केलेल्या लोकशाहीचा एक अति महत्त्वाचे विचार मंच आहे. ग्रामसभेचे नेतृत्व विशिष्ठ परिस्थितीत योग्य व अनुभवी व्यक्तींच्या माध्यमातून केल पाहिजे. जेणेकरून ती व्यक्ती स्वयंसेवी संघटनेमध्ये सहभागी असले अशा प्रकारे ग्रामपंचायतीने ग्रामीण विकासासाठी स्वयंसेवी संघटनांची मदत घेणे आवश्यक आहे.

**ग्रामसभेत महिलांचे स्थान :**

भारतात आजही परंपरागत रूढी—परंपरा जीवंत आहेत त्यामुळे महिलांना दुय्यम स्थान दिले जाते. असे म्हटले जाते की, जर कुटुंबाचा विकास करायचा असेल तर त्या कुंटुबातील महिला ही सुशिक्षित असली पाहिजे. म्हणून ग्रामसभेमध्ये महिलांचे स्थान महत्वाचे आहे. भारतात महिलांना राजकारणाला ५० टक्के आरक्षण आहे. त्याचे श्रेय खऱ्या अर्थाने, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दिले पाहिजे. कारण महिलांना ३५टक्के आरक्षण मिळावे यासाठी ते स्वत: देशाचे कायदे मंत्री असताना महिलांच्या आरक्षणासाठी लोकसभेत त्यांनी हिंदू कोड बीलचा प्रस्ताव मांडला. परंतू त्यावेळीच्या शासनाने तो प्रस्ताव नामंजूर केला. महिलांच्या आरक्षणासाठीचा हिंदू कोब बीलाचा प्रस्ताव शासनाने नामंजूर केला म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. महिलांना ५० टक्के राजकीय आरक्षण मिळाल्यामुळे ग्रामपंचायतीमध्ये महिला सदस्यांची प्रदीर्घ कालावधीनंतर संख्या वाढत चालली आहे. सध्या

भारतात महिला सरपंचाची संख्या जवळपास एक लाखाच्यावर आहे. म्हणजेच विकासांची संपूर्ण सुत्रे ही महिलांच्या ताब्यात आहेत. खऱ्या अर्थाने महिला अबला न राहता सबला बनत चालल्या आहेत यामुळे ग्रामीण विकासात मोलाची भर पडत आहे. अनेक बचत गटांच्या माध्यमातून महिलांनी ग्रामसभेत उपस्थित राहणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे महिलांच्यासाठी असणाऱ्या विविध योजना असतील, सामाजिक सुधारणांच्या मधील हिस्सा, अधंश्रध्दा निर्मुलन शिक्षण, दारिद्रय निर्मुलन, दारूबंदी, रोजगार इत्यादी कार्यक्रमांविषयी महिलांच्यामध्ये जागृती ही ग्रामसभेच्या माध्यमातून केली जाईल. महिलांच्यासाठी विविध शासकीय योजनांची माहिती, महिलांना प्रशिक्षण, अशिक्षित महिलांना शिक्षित करणे, त्यांच्या आरोग्यविषयी समस्या, विविध आरोग्यांची शिबिरे याविषयीच्या चर्चा ही ग्रामसभेत होण आवश्यक आहे.

**आर्थिक दृष्टीकोन :**

ग्रामसभेमध्ये ग्रामपंचायतीने एका वर्षाचा आर्थिक लेखा जोखा/अंदाजपत्रक मांडणे आवश्यक आहे. हे अंदाजपत्रक गावाच्या लोकसंख्येवर अवलंबून आहे. कारण भारतात आज जवळजवळ सात लाखाच्यावर खेडी अस्तित्वात आहेत. गावातील लोकसंख्या कमीत कमी १००० ते २००० पर्यंत आणि जास्तीत जास्त १०,००० पर्यंत असते त्यामुळे साहजीकच कमी लोकसंख्या असणाऱ्या गावाच्या उत्पन्नाचे स्त्रोत कमी आहेत. त्यामध्ये पाणी पट्टी, घरफाळा, इत्यादीचा प्रामुख्याने समाविष्ट होतो तर जास्त लोक संख्या असणाऱ्या गावातील उत्पन्नचे स्त्रोत हे घरफाळा, पाणी पट्टी, विविध जागांचे भाडे, बाजार कर, गायरानांचा लिलाव, यांचा प्रामुख्याने समावेश होतो. ग्रामपंचायतीला मिळणारा घरफाळा हा दरवर्षी लोकांच्याकडून गोळा केला जातो. एकूण जमा होणाऱ्या घरफाळयामधून १५ टक्के रक्कम ही गावातील मागासवर्गीय समाजाच्या सुधारणांसाठी खर्च केली जाते. तसेच पाणीपट्टीच्या माध्यमातून नोकर पगार, व लाईट बील अदा केले जाते. आता विविध जागांचे भाडे, बाजार कर, गायरानांचा लिलाव यातून मिळणारे उत्पन्न हे गावातील गरज असलेल्या सामाजिक सुधारणावर खर्च केले जातात. म्हणजे विविध शिक्षण, आरोग्य, विविध शिबीर, लोकांच्यासाठी व्याख्याने इत्यादीवर खर्च केले जातात. परंतू ग्रामसभेमध्ये यावर विशेष चर्चा होत नाही. त्यामुळे सत्ताधारी लोक जमा खर्चाचा अंदाजसुध्दा लागू देत नाही. प्रामुख्याने ज्याप्रमाणे केंद्र सरकार, राज्यसरकार, जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपरिषदा, पंचायतसमिती आपल्या एका वर्षाचे अंदाजपत्रक बनवून ते त्याचा एक अहवाल तयार करतात. त्याप्रमाणे ग्रामपंचायतीने मार्च महिन्यात एक ग्रामसभा बोलावून या ग्रमसभेमध्ये गावाच्या अंदाजपत्रकावर चर्चा घडवून आणणे गरजेचे आहे. या चर्चेमध्ये गावाची वसुली, गावातील विविध जागांचे भाडे, गायरानाचा लिलाव, बाजार कर इत्यादी प्रामुख्याने येणाऱ्या जमा महसुली घटकावर चर्चा करावी . ग्रमपंचायतीकडे जमा होणारा महसुल त्यामध्ये शासनाला जमा केलेला महसुल यावर चर्चा करून शिल्लक राहणारी रक्कम आणि शिल्लक राहणारी रक्कम ही महसूल गावातील सुधारणा करण्यासाठी कोणत्या घटकावर तो महसुल खर्च केला पाहिजे यावर ग्रामस्थांच्या समोर चर्चा करणे आवश्यक आहे.

**शासकीय योजना :**

ग्रामीण विकासासाठी आणि दारिद्रय निर्मुलनासाठी विविध योजना केंद्रसरकार व राज्य सरकार ग्रामपंचायतीच्या माध्यमातून राबविते. या योजनासाठी मिळणारे अनुदान हे केंद्रसरकार → राज्यसरकार → संबंधित विभाग → जिल्हापरिषद → संबंधित विभाग, → पंचायत समिती → ग्रामपंचायत → माध्यमातून अनुदान लाभार्थ्यांना मिळते. तसेच गावातील रस्ते सुधारणा, गटार बांधणी, शौचालय बांधणी इत्यादी कामांसाठी ग्रामपंचायती, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांच्याकडे कामांची मागणी करावी लागत होती. परंतू भारत सरकारने १ जानेवारी २०१३ DCT (Direct Cash Transfer) 'थेट रोख हस्तांतर योजना' सुरू केलेली आहे. या योजनेमुळे लाभार्थीच्या खात्यावर केंद्र सरकारकडून मिळणारी सबसिडी आणि ग्रामपंचायतीना पायाभूत सुविधांसाठी मिळणारी रक्कम ही थेट ग्रामपंचायतीच्या खात्यावर जमा होणार आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीना योग्य विकास करण्यासाठी प्रोत्साहन मिळणार आहे. यामध्ये प्रामुख्याने प्राथमिक शिक्षण, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण वाचनालय, अंतर्गत रस्ते, गटारी, नळ योजना, इत्यादी पायाभूत सुविधांवर खर्च करणे आवश्यक आहे. दर वर्षी केंद्राकडून येणाऱ्या रक्कमेचा हिशेब ग्रामस्थांसमोर ग्रामसभेत ठेवणे आवश्यक आहे. ग्रामसभेमध्ये कोणत्या कामांना प्राधान्य दिले पाहिजे, यावर चर्चा होणे गरजेचे आहे. अशा पध्दतीचे ग्रामपंचायतीमध्ये एका वर्षामध्ये जमा होणारा महसूल व खर्च होणारी रक्कम याचा विचार करून गाव पातळीवर आर्थिक बजेट तयार करणे गरजेचे आहे. मार्चमध्ये ग्रामसभा घेऊन तयार केलेले अंदाजपत्रक आणि विकास कार्यक्रम या विषयी ग्रामस्थांबरोबर चर्चा करून विकास कामांना मंजूरी घेऊन विकासकाम पूर्ण करावीत. केंद्र व राज्यशासनाने ग्रामपंचायती

सक्षम होण्यासाठी ग्रामपंचायतीना व्यापक अधिकार देण्यात आले आहेत. बहुतांश विकास योजनाच्या मंजुरीचे अधिकार ग्रामसभांना दिले आहेत. २४ एप्रिल ते १ मे च्या दरम्यानच्या सभेत आर्थिक वर्षातील खर्चावर व आणि पुढील नियोजनावर चर्चा केली जाते. त्यामुळे या ग्रामसभेला विशेष महत्व आहे.

**ग्रामसभा सशक्तीकरणातील समस्या :**

ग्रामसभेच्या सशक्तीकरणामध्ये अनेक समस्या निर्माण होत आहेत. ग्रामसभेला ज्या गतीने काम करणे आवश्यक आहे. त्यागतीने ग्रामसभा काम करत नाही. शासन संपूर्ण देशाच्या विकासाठी अनेक योजनांची घोषणा करत असते ज्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मजबूतीकरण प्राप्त होईल तसेच चालना मिळत राहील. परंतू या योजनांचा परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर किंवा गावपातळीवर झालेला दिसून येत नाही त्याची कारणे पुढीलप्रमाणे.

१. ग्रामसभेची बैठक नियमीत होत नाही तसेच ग्रामसभेच्या सूचना वेळेवर दिल्या जात नसल्यामुळे ग्रामीण भागातील लोक ग्रामसभेच्या बैठकीमध्ये सहभाग कमी दिसून येतो.
२. ग्रामपंचायतीमध्ये अनेक गावांचा समावेश असतो. ग्रामसभेच्यावेळी ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट असलेल्या गावांचा सहभाग करून घेणे अवघड जाते. कारण अनेक ग्रामपंचायतीकडे सुविधांचा अभाव असल्यामुळे लोकांची उपस्थिती कमी असते.
३. गावातील नागरिक ग्रामसभेकडे गांभीर्याने पाहत नाही. कारण ग्रामपंचायतीत सत्ताधारी लोक या ग्रामसभेमध्ये प्रभाव टाकतात आणि ग्रामसभेमध्ये इतर लोकांना मत/विचार मांडण्यासाठी संधी देत नाहीत तसेच गावातील विरोधी गट अशा ग्रामसभेवर बहिष्कार टाकतात.
४. ग्रामसभेच्या बैठकीच्या सूचना ग्रामपंचायत कमिटी वेळेवर देत नाहीत कारण ग्रामपंचायतीला भ्रष्टाचारी कारभारामुळे गावातील वातावरण पंचायतीच्या विरोधात असते त्यामुळे ग्रामसभेच्या गावात सुचना न देता ग्रामसभा सत्ताधारी पक्ष परस्पर घेत असतात.
५. अनेक ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेच्या बैठकांमध्ये उदासीनता दिसून येते कारण की, गावच्या विकासासाठी जी कामे करणे आवश्यक आहेत ती कामे ग्रामपंचायती मार्फत केली जात नाहीत यामुळे ग्रामपंचायतीला लोकांच्या टीकेला सामोरे जावे लागत असल्यामुळे ही उदासीनता निर्माण होते.
६. ग्रामपंचायतीमध्ये निवडून आलेल सदस्य हे वेगवेगळया पक्षांशी संबंधित असतात. त्यामुळे ते लोक ग्रामसभेच्या माध्यमातून आपल्या पक्षाचा प्रचार–प्रसार करत असतात. त्यामुळे ग्रामसभेला राजकीय स्वरूप प्राप्त होते.
७. राजकीय आरक्षणामुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, तसेच महिला हे ग्रामपंचयातीचे सरपंच असल्यामुळे ते ग्रामसभेचे अध्यक्ष असतात. त्यामुळे काही प्रस्थापित लोक ग्रामसभेला उपस्थिती राहणे आपला अपमान समजतात यामुळे ग्रामस्थांची उपस्थिती ग्रामसभेला कमी असते.
८. ग्रामपंचायतीमध्ये निवडून आलेल्या सदस्यांना काळानुसार प्रशिक्षण दिले जाते परंतू ग्रामसभेच्या सदस्यांना शासन स्तरावर कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण दिले जात नाही त्यामुळे ग्रामसभेचे महत्त्व कमी हात आहे.

**ग्रामसभा प्रभावशाली होण्यासाठीचे उपाय :**

ग्रामीण विकासाला चालना देण्यासाठी ग्रामसभेला प्रभावशाली होणे आवश्यक आहे. ग्रामसभेला सशक्तीकरण करण्यासाठी उपाय पुढीलप्रमाणे :

१. ग्रामसभेच्या बैठकी, सूचना/ नोटीस संपूर्ण ग्रामस्थांना देणे आवश्यक आहे. तसेच ग्रामसभेच्या बैठकीसाठी व्यापक प्रमाणात प्रचार–प्रसार करणे गरजेचे आहे.त्यासाठी, ग्रामसभेची नोटीस, फलक, दवंडी किंवा ध्वनीक्षेपकावरून देणे.
२. टी.व्ही, रेडिओ, पथनाटय, इत्यादी कार्यक्रमांमधून ग्रामससभेवर कार्यक्रमांच आयोजन करून ग्रामसभेविषयी लोकांच्यामध्ये जागृती निर्माण करते.
३. ग्रामसभेच्या बैठकीमध्ये सर्व सभासदांना प्रश्न विचारण्यासाठी प्रोत्साहन देणे, संधी देणे.
४. ग्रामसभेची बैठक वेळेवर झाली नाही तर ग्रामसभेचे महत्व कमी होणार आहे.त्यामुळे ग्रामपंचायत सदस्यांना जाणीवपूर्वक व जबाबदारीने हजर राहणे आवश्यक आहे. तथापी ग्रामसभेला एखादा ग्रामपंचायत सदस्य ग्रामसभेच्या तीन बैठकीत उपस्थित न राहिल्यास त्याचे ग्रामपंचायत सदस्यपद रद्द करण्यात यावे कारण ग्रामसभेच्या बैठकीचे आयोजन करणे हे ग्रामपंचायतीचे प्राधमिक जबाबदारी आहे.

५. ग्रामसभेतील कार्यवाही लोकांच्या भावनेचा आदर करून करावी. ग्रामीण जीवनाला प्रभावित करणाऱ्या मुद्यावर उदा. दारिद्रय रेषा, पंचायतीचे आर्थिक बजेट, विविध योजनांची प्रगती, अनुदानाचा उपयोग, लेखा परीक्षण इत्यादी मुद्यांवर ग्रामसभेमध्ये विचार—विमर्श झाला पाहिजे.

६. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाचा जसा संबंध आहे त्याचप्रमाणे ग्रामसभा सदस्य आणि ग्रामपंचायत यांचा विश्वासपूर्ण संबंध असणे आवश्यक आहे.

७. ग्रामसभेला पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेचे अधिकारी उपस्थिती राहणे आवश्यक आहे. जेणेकरून ग्रामसभेमध्ये सक्रियता निर्माण होईल.

८. ग्रामसभा ही समाजातील सर्व स्तरांवरील लोकांचा विचार करून वेळेवर बोलवावी. शेतीच्या कामाच्यावेळी शेतकरी कामात व्यस्त असतात त्यामुळे काही शेतकरी उपस्थित नसतात. म्हणून ग्रामसभेमध्ये सर्वांनी सहभागी व्हावे यासाठी योग्य दिवस निवडून त्यावेळी बैठक बोलावावी.

९. ग्रामपंचायतीचा आकार मोठा असतो. त्यामुळे ग्रामपंचायतीमध्ये कमीत कमी गावांचा समावेश करून ग्रामसभा यशस्वी करावी.

१०. तलाठी हा गावातील महसुल विभागाचा मुख्य सेवक आहे. यांनी सुध्दाग्रामसभेला उपस्थिती राहणे गरजेचे आहे.

११. ग्रामसभेच्या बैठकीचे मुल्यांकन हे शासकीय अधिकाराच्या माध्यमातून झाले पाहिजे, यामुळे ग्रामसभेमध्ये झालेल्या ठरावांचे मुल्यांकन करून त्यावरकायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.

१२. ग्रामसभेच्या बैठकीमध्ये जो ठराव मांडलेला आहे किंवा मंजूर केलेला आहे त्याचे लिखित स्वरूपात नोंद करणे आवश्यक आहे. कारण ग्रामपंचायतीच्यापुढील बैठकीमध्ये त्याचा अंमल केला जाईल.

१३. अनुसूचित जाती/जमाती, इतर मागासवर्गीय आणि महिला प्रतिनिधीचे नेतृत्वांन ग्रामसभेच्या बैठकीमध्ये प्रोत्साहन करणे जेणेकरून या वर्गातील नेतृत्वाचा ग्रामीण समाज स्वीकार करेल.

**समारोप :**

देशाचा विकास साध्य करावयाचा असेल तर प्रत्येक खेडयांना विकासाच्या प्रवाहात आणावे लागेल त्यासाठी ग्रामसभेला सर्वांगीण बाजून सक्षम करणे आवश्यक आहे. ग्रामसभा योग्यरीतीने घेतली गेली तर गाव सक्षम होऊन गावाचा जलद गतीने विकास होण्यास मदत होईल. ग्रामसभेचा अध्यक्ष हा शासनाचा प्रतिनिधी असतो त्याने शासनाच्या विविध योजनांची माहिती ग्रामसभेच्या सदस्यांना देणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत सदस्यांनी केंद्र व राज्यस्तरीय सर्व योजना सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचविणे गरजेचे आहे. जेणेकरून ग्रामसभेमध्ये वादविवाद न होता सुसंवाद निर्माण होण्यास मदत होईल. ग्रामसभेमध्ये वंचित घटकांचा समावेश करून त्यांना सभेमध्ये बोलण्याचा, समस्या मांडण्याचा अधिकार दिला पाहिजे. त्याचप्रमाणे महिलांचाही ग्रामसभेमध्ये सहभाग महत्त्वाचा आहे. ग्रामसभा घेतांना सर्व सभासदांना विश्वासात घेवून गावच्या विकासाचा विचार ग्रामसभेत केला पाहिजे. ग्रामसभेत विविध मुद्दयावर चर्चा होणे गरजेचे आहे. त्यामुळेच ग्रामसभेचे बळकटीकरण होऊन ग्रामसभा ही सर्वोच्च सभा होण्यास मदत होईल.

## संदर्भ :

1- http://humanliberty.blogspot.in
2- www.krushival.in.
3- www.agrowon.com.in.
4- http://onlinenews1.lokmat.com.
5- http://esakal.htm.
६. दैनिक सकाळ .
७. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८.
८. कुरूक्षेत्र २०१४.